# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दि.२७/०७/२०२३

दि.२६/७/२०२३ पासुन पावसाचा हवामान खात्याने रेड अलर्ट घोषित केला असल्यान शहरामध्ये १३२ MM पावसाची नोंद झाली आहे. नदया, नाले पातळी ओलांडुन वाहत आहे. त्यानुषंगाने सर्व अति.आयुक्त (सेवा) डॉ. करुणा जुईकर, व अति.आयुक्त (शहर) श्री. जमीर लेंगरेकर उपायुक्त श्री.नाईकवाडे व डॉ. सुभाष जाधव व प्रभाग अधिकारी ,आपत्ती व्यवस्थापक तसेच अग्निशमन अधिकारी यांनी शहरामध्ये बाधित झालेल्या ठिकाणी भेट देण्याचे व तेथील लोकांना सतर्क राहण्यास सुचित करा असे मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी निर्देश दिलेले आहे .

त्यानुषंगाने वरील अधिकारी यांनी शहरामध्ये स्वत: भेट देवून नदीकिनारी ज्या ठिकाणी लोकांच्या घरात पाणी शिरले आहे त्यांना सतर्क राहणेबाबत सुचित केले आहे. तसेच बाधित लोकांच्या जेवण्याची व्यवस्था वेदांत कॉलेज येथे केलेली असुन प्रभाग समिती १ या कार्यक्षेत्रातही जेवणाची ४०० पाकिटे पुरविण्याची व्यवस्था केलेली आहे. व इतर प्रभाग समितीमार्फत जसजशी मागणी येईल त्याप्रमाणे आवश्यक सूविधा व जेवण महापालिकेमार्फत पुरविले जाईल. असे मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी सांगितले आहे.

मा आयुक्त तथा प्रशासक यांनी शहरातील नदी किनारी राहणाऱ्या जनतेला सतर्क राहणेबाबत आवाहन केले आहे व महापालिका आपल्या मदतीसाठी सज्ज असून आपण महापालिकेस सहकार्य करावे म्हणजे आमची मदत ,सहकार्य तुमच्यापर्यंत पोहोचेल असे आवाहन केले आहे.

२७/७/२३

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका